उत्कृष्ट क्वालिटी
साबुदाणा ५५ रु.किलो
शेंगदाणे १०० रु.किलो
सेंद्रिय गुळ ५० रु.किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)



# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६८ ■ अंक क्र.१४१ ■ शुक्रवार २८ फेब्रुवारी २०२५ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.NO./DHL/53/24-26







# दत्ता गाडेला पकडण्यासाठी शंभर पोलिसांचा फौजफाटा नराधमाभोवती फास आवळला; मात्र आरोपी सापडेना!

**पुणे, दि.२७- स्वारगेट बस स्टँड बलात्कार प्रकरणातील आरोपी दत्तात्रय गाडेला पकडण्यासाठी शिरुरच्या गुनाट गावात पोलिसांचा ताफा पोहोचला आहे. सुमारे शंभर पोलिस आणि पोलिस स्कॉड दत्ता गाडेच्या मागावर असून तो ज्या ठिकाणी लपून बसला आहे त्या ठिकाणाला पोलिसांनी घेराव घातला आहे. दत्ता गाडे ज्या शेतामध्ये लपून बसला असल्याची माहिती आहे त्या ठिकाणी पोलिसांनी मोठा फौजफाटा तैनात केला आहे. या भागात पोलिसांकडून ड्रोनचीही मदत घेतली जात आहे.**



दत्ता गाडे हा ज्या शेतात लपून बसल्याची माहिती आहे त्या ठिकाणी पोलिसांचे डॉग स्कॉड पोहोचले आहे. दत्ता गाडे याने बुधवारी ज्या घरामध्ये पाण्याची मागणी केली होती त्या ठिकाणीही चौकशी करण्यात आली आहे. पाण्याअभावी आरोपी जास्त वेळ राहू शकणार नाही असा पोलिसांचा अंदाज आहे. आरोपी ज्या ठिकाणी लपून बसला आहे त्या ठिकाणी त्याला पाण्याचा पुरवठा होऊ नये याची खबरदारी पोलिसांनी घेतली आहे. या शेतात ज्या ठिकाणाहून पाणी पुरवठा केला जातो त्या लोकेशनवर पोलिसांचा बंदोबस्त आहे. त्यामुळे आरोपी जर पाणी प्यायला आला तर पोलिसांना त्याला पकडता येईल. दरम्यान, पन्नास तास उलटूनही आरोपी हाती लागलेला नसल्याने संपूर्ण फौजफाटा परत बोलावण्यात आल्याचे वृत्त रात्री प्राप्त झाले.

**बलात्कार करून कीर्तनाच्या कार्यक्रमात**

आरोपी दत्तात्रय गाडे याने मंगळवारी पहाटे तरुणीवर बलात्कार केला. त्यानंतर तो शिरुर तालुक्यातील गुनाट या त्याच्या गावी गेला. गावातील कीर्तनाच्या कार्यक्रमात देखील तो सहभागी झाला. त्यानंतर बुधवारी सकाळपर्यंत तो गावातच होता. मात्र दुपारी माध्यमांमधून त्याचे फोटो आणि नावासह बातम्या सुरु झाल्या तेव्हा तो गायब झाला.

**दत्ता गाडेचे राजकीय कनेक्शन?**

स्वारगेट अत्याचार प्रकरणातील फरार आरोपी दत्तात्रय गाडेचे (पान ४ वर)

## सुधारित वक्फ बोर्ड विधेयकाला मंजुरी


नवी दिल्ली, दि.२७- वक्फ बोर्ड विधेयकावरून गेल्या काही दिवसांपासून चर्चा चालू आहे. हे विधेयक अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या टप्प्यात संसदेत मांडण्यात आले होते. मात्र, त्यानंतर ते संसदीय समितीकडे पाठवण्यात आले. समितीकडून सुचवण्यात आलेल्या शिफारशींपैकी ४४ शिफारशी नामंजूर करण्यात आल्या तर १४ शिफारशी विचारार्थ घेण्यात आल्या. या १४ बदलांसह आता वक्फ बोर्ड विधेयकाचा सुधारित मसुदा केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजूर केला आहे. आता अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्यात हे विधेयक संसदेत मंजुरीसाठी मांडण्यात येईल, असे सांगितले जात आहे. संयुक्त संसदीय समितीमध्ये सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही (पान ४ वर)

# शंभर दिवसांच्या कृति आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी विशाल नरवाडे ठरले राज्यातील उत्कृष्ट मुख्य कार्यकारी अधिकारी



**धुळे, दि.२७- राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांच्या संकल्पनेनुसार राज्यात १०० दिवसांचा कृति आराखडा तयार करण्यात आला आहे. या १०० दिवस कृती आराखड्याची धुळे जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी सुरु आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी या आराखड्यातंर्गत राबविलेल्या विविध नाविण्यपूर्ण उपक्रमांबद्दल ते राज्यातील उत्कृष्ट मुख्य कार्यकारी अधिकारी ठरले असून याबद्दल त्यांचा आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेनुसार राज्यात राबविण्यात येत असलेल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याच्या अंमलबजावणीची आढावा बैठक सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या उपस्थितीत आज पार पडली. यावेळी राज्यातील १५ विविध विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय, महानगरपालिका, जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषदांमध्ये या आराखड्यातंर्गत सुरु असलेल्या उपक्रमांचे सादरीकरण (पान ४ वर)




# बिजासन घाटात लक्झरी बस उलटली बारा प्रवासी जखमी; गुन्हा दाखल

**शिरपूर दि.२७ (का.प्र.)- महाराष्ट्र मध्यप्रदेशाच्या सीमेवर बिजासन घाटाजवळ २७ फेब्रुवारीला पहाटे खाजगी लक्झरी बस उलटून झालेल्या अपघातात १२ प्रवासी जखमी झाले. मात्र बसचा वेग नियंत्रित असल्यामुळे प्रवाशांना किरकोळ जखमा झाल्या. त्यांच्यावर प्राथमिक उपचार उपचार करुन रवाना करण्यात आले.**

जांगीड विश्वकर्मा टूर्स अँड ट्रॅव्हल्स कंपनीची ही लक्झरी बस आहे. सदर बस(एमपी ५५, झेडडी ६४११) राजस्थान राज्यातील भिलवाडा येथून प्रवासी घेऊन पुण्याकडे निघाली होती. बिजासन घाट उतरल्यानंतर शिरपूरकडे येत असतांना चालकाचे नियंत्रण सुटले. त्यामुळे रस्त्याच्या बाजूला जाऊन बस उलटली. या अपघातात जखमी प्रवाशांना रुग्णवाहिकेने उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. प्रथमोपचार करुन त्यांना रवाना करण्यात आले. सर्व जखमी राजस्थान व मध्यप्रदेशातील रहिवासी आहेत. सांगवी पोलिस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली. यापूर्वी २५ फेब्रुवारीला पहाटे दभाशी गावाजवळ हंस ट्रॅव्हल्सची लक्झरी उलटून अपघात झाला होता. त्यात महिला ठार तर १५ प्रवासी जखमी झाले होते.

## शहाद्यात अपघात दुचाकीस्वार ठार

नंदुरबार, दि.२७ (प्रतिनिधी)- भरधाव वेगातील स्कार्पिओ गाडीने दुचाकीसह पादचारी महिलेला धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार जागीच ठार झाला तर पदचारी महिला जखमी झाल्याची घटना शहादा येथील प्रकाशा बायपास रस्त्यावर घडली. याप्रकरणी स्कार्पिओ चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकाशा बायपास रस्त्यावर काल सकाळी दहा वाजेच्या सुमारास भरधाव वेगात आलेल्या स्कार्पिओने (क्रमांक डीडी ०१ सी. ८०७८) दुचाकीला (क्र.जीजे २७ पी ८००१ धडक दिली. तसेच पदचारी महिलेला देखील सदर गाडीने ठोस मारली. या अपघातात दुचाकीस्वार सुरेश गोविंद पाटील (वय ६०, रा.परीमल कॉलनी) हे जागीच ठार झाले आहेत.

# शिवकालीन किल्ल्यांचे स्थापत्य यावर आज देवदत्त गोखले यांचे व्याख्यान

**धुळे दि.२७- येथील रोटरी क्लब व बिल्डर्स असोसिएशनच्यावतीने शुक्रवार दि.२८ रोजी शिवकालीन किल्ल्यांचे स्थापत्य या विषयावर दुर्ग संस्कृती अभ्यासक देवदत्त गोखले यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जन्मोत्सवा निमित्ताने बिल्डर असोसिएशन ऑफ इंडिया धुळे शाखा व रोटरी क्लब ऑफ धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने श्री शिवछत्रपतींचे तत्कालीन मुख्य अभियंते व रायगडाचे निर्माते श्री.हिरोजी इंदुलकर यांच्या मार्फत बांधलेल्या किल्ल्यांचे स्थापत्य हे केवळ एक भौतिक बांधकाम केले नाही तर ते एक संस्कृती दर्शक आहे त्यामध्ये असलेल्या कौशल्यांचा आणि कार्यसंस्कृतीचा अभ्यास केल्यास आपल्याला आपल्या कामात नव्या दिशा मिळू शकतात. याच पार्श्वभूमीवर जळगाव येथील दुर्ग संस्कृती अभ्यासक देवदत्त गोखले यांचे व्याख्यान शुक्रवारी सकाळी साडेदहा वाजता हॉटेल हॉटेल गणपती पॅलेस सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार अनुप अग्रवाल उपस्थित रहाणार (पान ४ वर)

## छतावरून पडल्याने कामगाराचा मृत्यू

धुळे, दि.२७- शहरातील वडजाई शिवारातील जामफळ धरणाचे पंपींग हाऊसचे फिटींगचे काम करत असतांना छतावरून पाय घसरून पडल्याने कामगाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. माहितीनुसार, मध्यप्रदेश बडवाणी जिल्हा नेवाली तालुक्यातील माहरत माल येथील सोळा वर्षीय अल्पवयीन बालक विनोद बलमसिंग पावरा हा दि.२३ फेब्रुवारी रोजी वडजाई शिवारातील जामफळ धरणाचे पंपींग हाऊसचे फिटींग करत होता. यावेळी छतावरून पाय घसरल्याने विनोद पावरा खाली कोसळल्याने गंभीर जखमी झाला. डॉ.अनुराग पाटील यांनी तपासून मयत घोषित केले. मोहाडी पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली आहे.




# आयुक्तांच्या घरासमोर शिवसेना उबाठाचे ढोल बजाओ आंदोलन

**धुळे, दि.२७- धुळे महानगरपालिकेने मालमत्ता कराची सक्तीने वसुली मोहीम राबविणे सुरू केले आहे. मनपातील वसुली विभागाचे अधिकारी स्वतः धुळे महानगरपालिकेच्या आयुक्त अमिता दगडे-पाटील यांच्या नेतृत्वात थकित मालमत्ता धारकांच्या घरासमोर ढोल बजाव आंदोलन सुरू केले आहे. महापालिकेत पुन्हा भ्रष्टाचार करता यावा यासाठी राज्य शासनाकडून विकास कामांसाठी पाचशे कोटींचा निधी मंजुरीकरीता मनपाला तीस टक्के रक्कम भरणे बंधनकारक आहे. त्याकरीता मनपा आयुक्त नागरिकांच्या घरासमोर स्वतः जावून ढोल वाजवून धुळेकरांची इज्जत वेशीवर टांगत असल्याचा आरोप करत शिवसेना संपर्क प्रमुख मा.आ.अशोक धात्रक, मा.आ. शरद पाटील, अतुल सोनवणे यांच्या नेतृत्वात आयुक्त अमिता दगडे-पाटील घरासमोर ढोल बजाओ आंदोलन केले.**

शहरातील चांगले तयार झालेले रस्ते पुन्हा मलनि:स्सारण योजने करता खोदणे, हजारो कोटींचा निधी विकास कामांसाठी आला ती दर्जा नसलेली विकास कामे कामे करून पूर्णत्वास नेणाऱ्या ठेकेदारांकडून टक्केवारी घेणें, ठेकेदारांना अभय देणे, विकास कामांचे वाढीव इस्टिमेट तयार करणे, शहरातील अनेक विकास कामांमध्ये झालेला भ्रष्टाचार लपविणे आधी गोष्टी डोळे झाक केली जाते आहे. महाराष्ट्र राज्य शासनाकडून विकास कामांसाठी येणारा पाचशे कोटी रुपयांचा निधी मंजूर व्हावा, व मंजूर निधीतून पुन्हा भ्रष्टाचार करता यावा याकरिता शासनाला भरावयाची असलेली तीस टक्के रक्कम महानगरपालिकेला जमा करण्यासाठी (पान ४ वर)

# तोरणमाळ यात्रोत्सवात भाविकांची गर्दी उसळली गुरु गोरक्षनाथांच्या दर्शनासाठी दोन कि.मी.ची रांग

**शहादा, दि.२७ (गिरिधर मोरे)- महाराष्ट्रातील दोन नंबरचे थंड हवेचे ठिकाण म्हणून ओळख असलेले सातपुड्याच्या चौथ्या रांगेतील तोरणमाळ (ता. अक्राणी) येथे महाशिवरात्री निमित्ताने गुरू गोरक्षनाथांची मोठी यात्रा भरते. या यात्रोत्सवास महाराष्ट्रसह मध्य प्रदेश, गुजरात, राजस्थान येथील भाविकांनी हजेरी लावली.**



महाशिवरात्रीच्या पुर्व संध्येलाच मोठ्या संख्येने भाविक खाजगी वाहनांनी दाखल झाल्याने तोरणमाळ पठार गर्दीने गजबजून गेले होते. महाशिवरात्रीच्या दिवशी पहाटे पासूनच गुरू गोरक्षनाथ मंदिरावर भाविकांची दर्शनासाठी सुमारे २ किलोमीटरची राग लागली होती. सर्वत्र भक्तीमय व अध्यात्मिक वातावरणाने तोरणमाळ परिसर हर्षोल्हासित झाला होता. विशेषतः नेमाळी बांधव व आदिवासी बांधव यांचा समूहा-समुहाने एकरंगी पेहराव यात्रेत आकर्षक ठरत होते. महाशिवरात्रीच्या दिवशी सकाळी गुरू गोरक्षनाथ यांची पालखी मंदिरापासून गावात ढोल ताश्यांचा गजरात काढण्यात आली. गुरू गोरक्षनाथ मठ-मंदिराचे महंत योगी संजूनाथ महाराज, माजी पोलीस पाटील ओलसिंग नाईक, तोरणमाळचे पोलिस पाटील अर्जुन नाईक, नवे तोरणमाळचे शुक्करसिंग नाईक, तलावडीचे पोलिस पाटील मोहन पटले, सामाजिक कार्यकर्ते जीवनदादा रावताळे, सुरमल पहाडसिंग नाईक, भुरसिंग नाईक, दिलीप रावताळे, तुकाराम बाबाजी, उमेश गुरव जायखेडकर, लोटून पाटील दोंडाईचा यांच्या सह ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी पोलीस अधीक्षक श्रवण दत्त एस यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी दत्ता पवार, म्हसावद पोलीस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक गणेश वारुळे, पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र पाटील, अजित गावित, राकेश पावरा, दादाभाई साबळे यांच्यासह मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला होता. यावेळी ग्राम पंचायत मार्फत पाण्याची सोय सुविधा उपलब्ध करण्यात आली तसेच स्वच्छतेसाठी ग्रामविकास अधिकारी विरसिंग पावरा, उपसरपंच रमेश पहाडसिंग चौधरी व ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. तसेच यात्रा उत्सव सुरळीत पार पाडण्यासाठी राणीपूर ते तोरणमाळ घाटातील अडचणींच्या स्थळांपर्यंत नंदुरबार वनविभागाचे उपवनसंरक्षक संतोष सस्ते, शहादा विभागाचे सहाय्यक (पान ४ वर)



## जि.पो. अधीक्षक धिवरेंना बालस्नेही पुरस्कार जाहिर

धुळे, दि.२७- महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाद्वारा दिला जाणारा यावर्षीचा बालस्नेही पुरस्कार २०२४ उत्कृष्ट पोलीस अधीक्षक म्हणून धुळे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरेंना जाहिर झाला आहे. पुरस्कार सोहळा दि.३ मार्च रोजी दुपारी एका वाजता मुंबई, यशवंतराव चव्हाण सेंटर, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, नरीमन पॉईंट येथे होणार (पान ४ वर)

## शिवधाम उद्यानाचे नंदुरबारात लोकार्पण

नंदुरबार, दि.२७ (प्रतिनिधी)- महाशिवरात्रीचा मुहूर्त साधून हर हर महादेवाच्या जयघोषात नंदुरबार शहरातील शिवधाम उद्यानाचे लोकार्पण करण्यात आले. उद्यानात ध्यानावस्थेतील स्थानापन्न असलेल्या शिवजींच्या मूर्तीच भाविकांनी दर्शन घेतले. नंदुरबार नगरपरिषदेच्या माध्यमातून व शिवसेनेचे संपर्कप्रमुख तथा माजी आ.चंद्रकांत रघुवंशी, माजी नगराध्यक्षा रतका रघुवंशी मांच्या संकल्पनेतून शहरात शिवधाम उद्यान साकारण्यात आले आहे. कात महाशिवरात्रीचा मुहूर्त साधून शिवसेनेचे संपर्कप्रमुख तथा माजी आ.चंद्रकांत (पान ४ वर)

# महापालिकेच्या छतावर सौर पॅनल पस्तीस लाखांची विज बचत होणार

**धुळे, दि.२७- महापालिकेला माझी वसुंधरा २.० अंतर्गत मिळालेल्या बक्षिसाच्या रकमेतुन एक कोटी सत्तावीस लाख रूपये खर्चाचा सौर उर्जा प्रकल्प महापालिकेच्या छतावर उभारण्याचे काम पुर्णत्वाकडे आले आहे. दोनशे के.व्ही. विज क्षमतेच्या सौर पॅनल उभारणीला गती आली असून मनपाला दरमहा येणारा बावन्न लाखांचा विजेच्या खर्चाला कात्री लागणार आहे. सौर पॅनलमुळे पस्तीस लाखांची मोठी आर्थिक बचत होणार आहे. अशी माहिती अधिकृत सुत्रांनी दिली.**



महापालिकेत उत्पन्नापेक्षा खर्चाचे आकडे मोठे असल्याने खर्चाच्या रकमेला आळा बसावा यासाठी आयुक्त तथा प्रशासक अमिता दगडे-पाटील यांनी माझी वसुंधरा २.० (पान ४ वर)

## टॅक्टरची दुचाकीला धडक; एक ठार

धुळे, दि.२७- धुळे तालुक्यातील फागणे ते अमळनेर रस्त्यावर हिमालया कंपनी समोर भरधाव वेगाने जाणाऱ्या ट्रॅक्टरने दुचाकीला मागुन धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात चौसष्ट वर्षीय इसमाचा गंभीर जखमी होवून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. कृष्णा रतन थोरात यांनी दि.२४ फेब्रुवारी रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, धुळे तालुक्यातील अंबोडे गावातील कैलास विश्वनाथ थोरात (वय ६४) हे दुचाकी क्र.एमएच १८/एआर-७३८१ घेवून फागणे ते अमळनेर रस्त्याने जात असतांना मागुन भराधाव वेगाने येणारे ट्रॅक्टर क्र.एम एच १९/बीजी-०८१० ने जोरदार धडक दिल्याने अपघात झाला.

# शिरपूर फर्स्टचे टोल नाक्यावर आंदोलन टोलमाफी नाही; व्यवस्थापकांचा खुलासा

**धुळे, दि.२७- शिरपुर शहराजवळील टोलनाक्यावर शिरपुर शहरासह तालुक्यातील वाहनधारकांकडून टोल वसुली केली जात असल्याने शिरपूर फर्स्ट या संघटनेच्या वतीने मोर्चा काढून मोठे आंदोलन करण्यात आले. यावर टोलनाक्याचे व्यवस्थापक कृष्णा राव यांनी केंद्र शासनाच्या नियमानुसार अधिकृत टोल नाका आहे. कोणतीही टोल माफी मंजुर झालेली नसल्याचे कृष्णा राव यांनी स्पष्ट केले आहे.**

टोल व्यवस्थापक कृष्णा राव यांनी सांगितले की, शिरपूर फर्स्टचे याआधीही आलेले निवेदन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणकडे पाठविण्यात आले. राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाने जिल्हाधिकारी, शिरपूर पोलीसांना पाठविलेल्या उत्तरात नमुद केले आहे की. शिरपुर तालुक्यातील वीस कि.मी. अंतराच्या आतील वाहनधारकांनो ३४० रूपयांमध्ये लोकल पासची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. लोकल पासची सुविधा सुरू असून त्यासाठी वाहनधारकांनी आधारकार्ड, वाहन परवाना दाखविणे गरजेचे आहे. केंद्र शासनाने दिलेल्या नियमा नुसार टोलचे दर ठरविण्यात आलेले असुन टोल अधिकृत आहे, बेकायदेशीर काहिही नसल्याचेही कृष्णा राव यांनी स्पष्ट केले.

## विष प्राशन करून तरूणाची आत्महत्या

**धुळे, दि.२७- धुळे तालुक्यातील नेर लोणखेडी फाटा चेंदड भिलाटी येथील एकोणावीस वर्षीय तरूणाने काही तरी विषारी औषध प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली आहे.**

नातेवाईकांनी दिलेल्या खबरीनुसार, नेर गावाजवळील यशवंत इंग्लिश मेडियम स्कूल जवळ अशोक भिवा ठाकरे (वय १९) याने दि.२१ फेब्रुवारी रोजी दुपारी तीन वाजेच्या सुमारास काही तरी विषारी औषध प्राशन केल्याने त्याला (पान ४ वर)


दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -78,750 रु.+3% GST
सोने- 24 K -86,000 रु.+3% GST
चांदी- 98,500 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३


# शेतकऱ्यांसह वीज मंडळ अडचणीत येणार राज्य सरकारने वेळीच निर्णय घेणे आवश्यक

**शासनाने वीज मोफत देऊन शेतकऱ्यांवर फार मोठे उपकार केले असले तरी, शेतकऱ्यांकडून ज्या चुकीच्या पद्धतीने फुकट विजेचा फायदा उचलला जातो त्यामुळे वीज मंडळाचा मोठा तोटा होत आहे. दुसरीकडे शेतकऱ्यांना देखील विजेचा प्रवाह विकत द्या पण सलग द्या असे सांगण्याची पाळी आलेली आहे. याचबरोबर शासनानचे नवीन डीपी शक्यतो न देण्याची धोरण हे देखील शेतकऱ्यांसाठी अडचणीचे होऊन बसले आहे.**

**विशेष संपादकीय**

महाराष्ट्रात साडेसात अश्वशक्ती (एच.पी) पर्यंत शेतकऱ्यांना वीज मोफत करण्यात आली आहे. या मोफत विजेचा आनंद शेतकरी वर्गामध्ये असला तरी ऊस गोड लागला म्हणून मुळासकट खाण्याची प्रथा सुरू झाली असल्याचे दिसते. ज्याच्याकडे पूर्वीच एक विजेचे कनेक्शन होते व तो वीज मंडळाच्या ग्राहक होता त्याने एकाच विहिरीमध्ये दोन ते तीन मोटारी टाकून फुकट मिळणाऱ्या विजेचा जास्तीत जास्त लाभ कसा घेता येईल याचे प्रयत्न सुरू केले आहे. मात्र अति तिथे माती अशी परिस्थिती आता शेतकऱ्यांबरोबरच वीज मंडळाची देखील होऊ लागली आहे. यंदाच्या वर्षी मोठा पाऊस झाला. पावसाळ्यानंतर देखील पाऊस सुरू होता. यामुळे धरण विहिरी यांना भरपूर प्रमाणात पाणी आहे. या भरपूर प्रमाणात उपलब्ध असलेल्या पाण्याचा लाभ जास्तीत जास्त कसा घेता येईल. संपूर्ण शेतीचे क्षेत्र बागायत कसे ठेवता येईल, अधिक उत्पन्न कसे घेता येईल, या नादात अधिकृत एक विजेच्या कनेक्शन बरोबर अनधिकृतपणे दोन तीन मोटारी टाकून पाण्याचा उपसा गेल्या तीन महिन्यापासून सुरू आहे. यामुळे वीज मंडळांनी ठिकठिकाणी बसवलेल्या ट्रान्सफॉर्मरवर सर्वाधिक प्रमाणात भार पडत आहे. हा भार अधिक झाल्याने विजेचा प्रवाह कमी प्रमाणात मोटारींना मिळतो. ठिबक सिंचन असणाऱ्यांना पाहिजे त्या प्रमाणात पाण्याचा दाब मिळत नसल्याने पिकांवरती त्याचा परिणाम दिसून येतो. त्याचबरोबर कमी



विज दाबामुळे मोटारी जळण्याचे देखील प्रमाण वाढते आहे. कमी दाबाने मोटारी चालत असल्याने मोटारीला वीजप्रवाह पुरवणाऱ्या वायर गरम होऊन शॉर्ट होतात. स्टार्टर देखील खराब होते. या गंभीर परिस्थितीमध्ये सगळ्यांच्या मोटारी चालू राहिल्यास आपोआप त्याचा परिणाम वीज मंडळाच्या ट्रान्सफरवर होतो. ट्रांसफार्मर जळून जातो,ऑइल फेकून देतो किंवा त्याच्यामधला काही वाईन्डिचा भाग निकामी होतो.पर्यायाने लोकांना नवीन ट्रांसफार्मरची मागणी करावी लागते. यामधे शेतकऱ्याचे नुकसान होते.

राजकारणी, केवळ जनतेला त्यांच्या मागणीची पूर्तता करून देत आहोत यातच धन्यता वाटते. यांचे राजकारण टिकवण्यासाठी हे करणे क्रमप्राप्त आहे. पण त्याचबरोबर त्यांनी वाईटपणा घेण्याची देखील भूमिका अंगीकारली पाहिजे. त्यांना हे माहिती आहे की, वीज फुकट असल्यामुळे ज्यांच्या डिमांड नोट भरलेल्या आहेत त्यांनाच पुरवठा केला गेला (पान ४ वर)

## विहिरीत बुडून मृत्यू

धुळे, दि.२७- तालुक्यातील धमाणे गावातील त्रेसष्ट वर्षीय ज्येष्ठ इसमाचा विहिरीत तोल गेल्याने बुडून मृत्यू झाला आहे. नातेवाईकांनी दिलेल्या खबरीनुसार, धमाणे येथील वसंतु पुंजू पाटील (वय ६३)हे शेतात विहीरीत पाणी बघण्यासाठी गेले असता त्यांचा तोल जावून विहीरीत पडले. गावातील नागरिकांच्या मदतीने त्यांना बाहेर काढून खाजगी वाहनाने हिरे मेडिकल कॉलेज येथे उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले. या प्रकरणी सोनगीर पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.


Consulting Chambers
with following Amenities available on Rental basis
1) well Furnished
2) Attractive Reception Hall
3) Lan
4) WiFi
5) EPBX
6) CCTV Camera
7) Seprate MSEB meter
8) Corporate Ambience
9) Attached Toilets
Venue : Meera Hospital
station Road, Dhule
Phone : 7972588499
visiting time : 10 am to 12 noon

**पान १ वरुन**

## शंभर पोलिसांचा फौजफाटा

राजकीय कनेक्शन असल्याची चर्चा सुरू झाली आहे आणि ही चर्चा सुरू होण्याचे कारण म्हणजे, अजित पवारांच्या आमदाराच्या फ्लेक्सवर झळकलेला गाडेचा फोटो. शिरुरचे माजी आमदार अशोक पवार यांच्या वाढदिवसानिमित्त लावलेल्या फ्लेक्सवर, दत्ता गाडेचा फोटो झळकला आहे. शिवाय शिरुर हवेली विधानसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे आमदार माऊली कटकेंसोबत आणि त्यांच्या फ्लेक्सवरही आरोपीचे फोटो झळकले. त्यामुळे नराधम गाडे हा आमदार माऊली कटकेंचा कार्यकर्ता असल्याचा आरोप होत आहे. याबाबत स्वत: आमदार कटकेंनी स्पष्टीकरण दिले.

## वक्फ बोर्ड विधेयकाला मंजुरी

आघाडीच्या घटकपक्षांच्या सदस्यांनी एकूण १४ शिफारशी केल्या, तर विरोधातील इंडिया आघाडीच्या सदस्यांनी ४४ बदल या विधेयकात सुचवले होते. मात्र, वक्फ बोर्ड विधेयकात विरोधकांनी सुचवलेल्या सर्व ४४ शिफारसी नामंजूर करण्यात आल्या आहेत. येत्या १० मार्चपासून अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा टप्पा सुरू होत आहे. याच काळात विधेयकाचा सुधारित मसुदा संसदेत मंजुरीसाठी मांडण्यात येईल. यात समाविष्ट १४ सुधारणांमध्ये वक्फ बोर्डाची मालमत्ता संकेतस्थळावर नोंद करण्यासाठीच्या सहा महिन्यांच्या मर्यादेत सूट देणे, मालमत्ता वक्फ बोर्डाची आहे की सरकारची हे ठरवण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांकडून सरकार नियुक्त अधिकाऱ्याकडे हस्तांतरित करणे आणि मुस्लीम कायदे व तत्त्वांचे ज्ञान असणाऱ्या एका व्यक्तीची वक्फ लवादात नियुक्ती करणे या तीन महत्त्वाच्या सुधारणा मानल्या जात आहेत.

## उत्कृष्ट मुख्य कार्यकारी अधिकारी

करण्यात आले. यामध्ये जिल्हा परिषद गटात सादरीकरणाची संधी धुळे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी मिळाली. श्री. नरवाडे यांनी केलेल्या कामकाजाचे उत्कृष्ट सादरीकरण केल्याने ते राजयातील उत्कृष्ट मुख्य कार्यकारी अधिकारी ठरले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते त्यांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

या सादरीकरणात राज्य शासनाने ठरवून दिलेल्या सात कलमी कार्यक्रमाबरोबरच विविध नाविण्यपूर्ण उपक्रमांचे सादरीकरण नरवाडे यांनी केले. जिल्हा परिषदेचे संकेतस्थळ तयार करण्यात धुळे जिल्हा परिषद राज्यात चौथ्या तर नाशिक विभागात प्रथम क्रमांकावर आहे. यामुळे ग्रामविकास विभागाच्या ७ सेवा ऑनलाईन प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. सुकर जीवनमान अतंर्गत सेवांचीर पोहोच सुनिश्चित करण्यासाठी आणि ग्रामीण भागात राहणीमान सुलभ करण्यासाठी ९ उपक्रम राबविण्यात येत आहे. कार्यालयीन स्वच्छता उपक्रमातंर्गत स्वच्छतेची पंचसुत्री तयार करण्यात येऊन जुन्या निरुपयोगी वस्तुंची विल्हेवाट लावण्यात आली आहे. तक्रार निवारण उपक्रमातंर्गत आपले सरकार पोर्टलवरील ३४९ तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे. अभ्यागत भेटीचे नियोजन, नागरीकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. त्याचबरोबर कार्यालयीन सोईसुविधा उपक्रमातंर्गत कार्यालयाच्या आवारात स्वच्छ पिणयचे पाणी, स्वच्छ प्रसाधनगृह, सुसज्ज प्रतिक्षालय, प्रथमोपचार पेटी, दिव्यांग अभ्यागतांसाठी व्हीलचेअर, कार्यालयाचे सौंर्दयीकरण करण्यात आले आहे. क्षेत्रीय कार्यालयांना भेटी उपक्रमातंर्गत आठवड्यातून किमान २ दिवस क्षेत्रीय कार्यालयांना भेटी देऊन पाहणी करण्यात येत आहे. प्रशासकीय कामकाजात १ जानेवारीपासून ई-ऑफिस प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. यामुळे कामकाजास गती आली आहे. आर्थिक व औद्योगिक गुंतवणूकीस प्रोत्साहन उपक्रमातंर्गत उद्योगांना पोषक वातावरण तयार करण्यात येत आहे. त्यासाठी लागणाऱ्या परवानग्या, नोंदणी, कर भरण्याची सुलभता पध्दत सोपी करण्यात आली आहे. अधिकारी, कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी व कृत्रिम बुध्दीमत्ता व तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यात आला आहे.

याशिवाय नाविण्यपूर्ण उपक्रमात घरकुल लाभार्थ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्या सोडविण्यास प्राधान्य देण्यात येत असल्याने काम पूर्णत्वास गती आली आहे. शिवाय कॉपी मुक्त अभियानाचा धुळे पॅटर्न राज्यभरात नावारुपास येत असून या उपक्रमाचे शिक्षणमंत्री, मुख्य सचिव तसेच शिक्षण आयुक्त यांनीही कौतुक केले आहे.

## आज देवदत्त गोखले यांचे व्याख्यान

आहेत, या निमित्ताने आपल्याला शिवकालीन प्राचीन किल्ल्यांचे रहस्य उलगडून आणि त्या ज्ञानाचा समकालीन उपयोग ऐकण्याची संधी उपलब्ध झाली आहे. या कार्यशाळेतून धुळेकरांना बहुमोल व विविधांगी असे ज्ञानार्जन होणार आहे. हे व्याख्यान सर्वांसाठी खुले असून कोणतेही प्रवेश शुल्क नाही. तरी या महत्त्वपूर्ण व्याख्यानाचा लाभ घेण्याचे आवाहन नितीन खिवसरा अध्यक्ष बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया धुळे शाखा, राहुल कुलकर्णी अध्यक्ष रोटरी क्लब धुळे, अक्षय मुंडके सचिव बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया धुळे शाखा व दिपक अहिरराव सचिव रोटरी क्लब धुळे व समस्त पदाधिकारी यांनी केले आहे.

## तोरणमाळ यात्रोत्सवास भाविकांची गर्दी

वनसंरक्षक संजय साळुंखे, वनपरिक्षेत्राधिकारी तोरणमाळ महेश चव्हाण, वन परिमंडळ अधिकारी दिलीप केळकर, वन परिमंडळ अधिकारी श्री.सोनवणे रात्री उशिरापर्यंत थांबून होते. विशेषतः सर्वच अधिकारी गणांनी सव्वा मण रोटप्रसाद बनविण्याची सर्व प्रक्रिया बघितली. भाविकांना यात्रेदरम्यान आरोग्याची समस्या उद्भवू नये म्हणून तोरणमाळ ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ.सुहास पाटील, झापी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.शम्मी गोविंद वसावे व कर्मचारी पथक दक्ष होते.

यात्रेत जडीबुटी व आयुर्वेदिक औषधांची मोठ्या प्रमाणावर दुकाने थाटली गेली होती. गृहपयोगी वस्तू व महिलांच्या साज शृंगरांची दुकाने तसेच आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवणारी विविध अलंकारांची दुकाने यात्रेत लावली गेली होती. तसेच आदिवासी सेवक पुरस्काराने सन्मानित झालेले हरहुन्नरी कलाकार गोसा पेंटर यांची आदिवासी संस्कृतीचे दर्शन घडवणारी पेंटिंग्स यात्रेचे खास आकर्षण ठरले. या यात्रेत मोठ्या प्रमाणात भाविक येतात. त्यांची गैरसोय होऊ नये म्हणून अनेक स्वंयसेवक स्वतःहून सेवेसाठी स्वइच्छेने श्रमदान करतात. त्यात विश्व हिंदू परिषद व बजरंग दलचे संजय तुकाराम पाटील, भरत केशव पटेल हे २५ वर्षापासून भंडाऱ्याचे आयोजन करतात. यासाठी प्रसन्न रमेश पाटील, झुलाल वाघ, राजेश चौधरी आदिंची परिश्रम घेतले. महाशिवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी पहाटेपासून गुरू गोरक्षनाथ मठ- मंदिराचे महंत योगी संजूनाथ महाराज यांच्या हस्ते महाप्रसादाचे वाटप करण्यात येऊन यात्रेचे यशस्वी समापन करण्यात आले.

## महापालिकेच्या छतावर सौर पॅनल

अंतर्गत मिळालेली रक्कम सौर पॅनल उभारून सार्थकी लावली आहे. महापालिकेच्या आवारात विज वितरणचे सहाशे के.व्ही.क्षमतेचे ट्रान्सफार्मर आधीच बसविण्यात आलेले आहे. परंतु वीज बिलावर होणारा खर्च जास्त असल्याने त्यावर आळा बसावा यासाठी सौर पॅनल बसविण्याचे निश्चित करण्यात आले आहे. प्रशासकांच्या हाती मनपाचा कारभार आहे. मनपात महापौर, उपमहापौर, स्थायी समिती सभापती व इतर पदाधिकाऱ्यांच्या दालनांचा वापरा अभावी वातानुकुलित यंत्रणा बंद आहे. परंतु निवडणुका पार पडल्या कि पुन्हा विजेचा वापर वाढणार आहेच. विज बिलात बचत करता यावी, यासाठी दोनशे के.व्ही. क्षमतेचे सौर पॅनल बसविण्यात येत आहेत.

मनपाचे विविध ठिकाणी असलेल्या पाच दवाखान्यांमध्ये प्रत्येकी दहा के.व्ही. क्षमतेचे सौर पॅनल बसविण्यात आलेले आहेत. त्यात प्रभात नगर, बापट दवाखाना, सुतिका गृह, कुटूंब कल्याण सुभाष नगर व नंदी रोड परिसरातील दवाखान्यांचा समावेश आहे. तसेच मालेगाव रोडवरील सर विश्वेश्वरैया जलकुंभ येथेही सौर पॅनल उभारण्यात आलेले आहेत. सौर पॅनलमुळे वीज बिलात कपात होवून महापालिकेच्या गंगाजळीत भर पडणार असल्याने मनपातील खर्चालाही काही अंशी चाप बसणार आहे.

**पान १ वरुन**

## वीज मंडळ अडचणीत येणार

पाहिजे. ज्यांनी डिमांड नोट भरलेली नाही अशा बेकायदेशीर चालणाऱ्या वीज मोटारींवर कारवाई झाली पाहिजे हे त्यांनी सांगितले पाहिजे. मात्र तसे होत नाही. वाईटपणा घेण्याचे वाटेकरी व्हायला लोकप्रतिनिधी तयारी नाही. पर्यायने या सगळ्या कारणांचा फटका हा शेतकऱ्यांना तर बसतोच, पण त्याचबरोबर वीज मंडळाला देखील मोठ्या प्रमाणात बसत आहे. प्रत्येक वेळेला डीपी जळाली की पुढाऱ्यांची मनधरणी केली जाते. अधिकाऱ्यांवर दबाव टाकला जातो व नवीन ट्रान्सफॉर्मर दोन चार दिवसांमध्ये दिला जातो. या दरम्यान, तापमान वाढले असल्यामुळे पिकांना पटकन झटका बसतो व उत्पादनावर त्याचा परिणाम होतो.अनेक भागात सध्या गहू, हरभरा, मका काढणीला आला आहे. या काळात त्यांना पाणी न मिळाल्यास उत्पन्नावर त्याचा गंभीर परिणाम होतो हे शेतकरी वर्ग समजून घेण्यास तयार नाही. वीज प्रवाह सुरू असताना जास्त मोटारीच्या साह्याने कसे पाणी भरून घेता येईल यावर तो लक्ष केंद्रित करतो. याचा मोठा ताप इतर शेतकऱ्यांना व वीज मंडळाला होऊ लागला आहे. याबाबतीत आता राज्य सरकारनेच पुढाकार घेणे गरजेचे आहे. सलग वीज पुरवठा व वीज मंडळाचे नुकसान थांबवणे यासाठी कणखर भूमिका घेणे आवश्यक आहे.

राज्य सरकारने वीज फुकट दिली. पण ती फुकट देताना आकडे टाकुन परस्पर विजेची चोरी करणे, किंवा एका मोटारीचे कनेक्शन असताना चार चार मोटारी लावून वीज घेण्यासाठी मोफत केलेली नाही, हे आता जाहीरपणे सांगण्याची वेळ आली आहे. आजही वीज मंडळाच्या अधिकारी जाऊन एकापेक्षा अधिक कनेक्शन असलेल्या ठिकाणी डिमांड नोट नसताना विजेचे चोरीच्या नियमा खाली कारवाई करू शकतात, मात्र तसे होताना दिसत नाही. शासनाने आम्हाला वीज फुकट दिली आहे. तुम्हाला आमच्यावर कारवाई करण्याचा काय अधिकार असे म्हणत सर्वत्र दादागिरी दाखवली जात आहे. यावर राज्य सरकारने निर्णय घेणे गरजेचे झाले आहे. वीज फुकट राहू द्या पण नियमाप्रमाणे जे वीज मंडळाचे ग्राहक आहेत त्यांनाच याचा लाभ मिळू द्या. केवळ आपण ग्राहक आहोत म्हणून वाटेल तेवढ्या अश्वशक्तीच्या (एचपी) मोटारी टाकून विज उचलली जाणार असेल तर तिथे कारवाई करण्याच्या दृष्टीने निर्देश दिले गेले पाहिजे. अधिक मोटारींमुळे जो जबरदस्त फटका वीज मंडळस बसत आहे, त्यावर कारवाई होणे देखील तितकेच गरजेचे झाले आहे. वीज मंडळाचे अधिकारी व कर्मचारी अशा कारवाईपासून स्वतःला दूर ठेवण्याचा प्रयत्न करत असल्याने मजिसकी लाठी उसकी भैसफ या म्हणी प्रमाणे जे ट्रान्सफॉर्मरच्या जवळ असतात त्यांना सलग वीज मिळते तर ट्रान्सफॉर्मर पासून लांब असणाऱ्यांना विजेचा प्रवाह कमीदाबाने मिळतो. शासनाने संपूर्ण महाराष्ट्रात तयार झालेला हा प्रश्न दूर करण्याच्या दृष्टीने तातडीने निर्देश देणे आवश्यक झाले आहे. आता विजेचे पैसे घ्या पण सलग पुरवठा करा असे सांगण्याची वेळ आली आहे. अर्थात यामुळे शेतकरी वर्ग काही प्रमाणात, शासन फुकट वीज देत असताना तुम्ही विकत कसे मागतात, आम्हा गरिबांचे काय? असा प्रश्न डोके वर काढू शकतो. पण जिथे विजेची लूट सुरू असेल व इतरांना यामुळे वीज प्रवाह पासून वंचित राहावे लागत असेल तर त्यांना वीज विकत द्या पण सलग द्या हे सांगावे लागणार आहे. शेतीमध्ये अगोदरच मजुरीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालला आहे. शासनाच्या अनेक योजना ह्या लोकांना मेहनत मजुरीपासून दूर नेऊ लागल्या आहेत. अल्पशा गरजा भागवण्यासाठी काही दिवस काम केल्याने आपला प्रश्न सुटू शकतो या एका विचाराने शेतात काम करणाऱ्या मजुरांची संख्या कमी होऊ लागली आहे. हे सर्व घडत असताना राज्यकर्त्यांनी गांभीर्याने विचार करावा की या त्यांच्या योजनांमधून देशाचा अन्नदाता म्हणून ओळख असणारा शेतकरी संपत चाललाय. लोक फळबागेकडे वळत आहेत. पण निव्वळ फळबागेतून देशाचे पोट भरणे शक्य नाही. यामुळे भविष्यात अन्नधान्य उत्पन्नावर गंभीर परिणाम होऊ शकतो. याच विषयाला जोडून शेतीतील विजेचा पुरवठा हा देखील गंभीर असल्याने त्याचा विचार होणे आवश्यक आहे.

सोलार वीज पंप योजना उत्तम असली तरी बदललेल्या हवामानाची परिस्थिती बघता अनेकदा ढगाळ वातावरण आल्याने हे वीज पंप काम करू शकत नाही. कमी ऊन असताना किंवा संध्याकाळी लवकर सोलारचा पंप बंद न केल्यास पुढे एक ते दोन दिवस तो पंप चालू शकत नाही.तज्ञांना बोलावून त्याला पुन्हा रिसेट करावे लागते, तेव्हाच तो चालू होतो. अनेकदा पाऊस पडत नाही. पण निव्वळ ढगाळ वातावरण असते, अशा परिस्थितीत सोलार पंप उपयुक्त ठरत नाही. त्यामुळे शेतकऱ्याला पुन्हा वीज प्रवाहवर अवलंबून राहावे लागते. पण तोही नीट न मिळाल्यास आपोआप शेतकऱ्याला आर्थिक फटका बसतो. उत्पन्न व्यवस्थितपणे येत नाही. पर्यायाने देशाच्या अन्न निर्मितीवर देखील याचा परिणाम होतो. वीज मंडळात नोंदणी असलेल्या शेतकऱ्यांच्या मोटारी योग्य एच.पी इतकीच वीज वापरतो आहे की नाही याची तपासणी होणे अत्यावश्यक झाले आहे. राज्य सरकारने या संदर्भात तातडीने निर्णय घेतल्यास सर्वांचे हिताचा ठरणारा होईल.

## उबाठाचे ढोल बजाओ आंदोलन

आयुक्त स्वतः थकबाकीदारांच्या घरासमोर जाऊन ढोल वाजवून नागरिकांची इज्जत वेशीला टांगत असल्याचे शिवसेना उबाठाने पत्रकात म्हटले आहे.

मनपा आयुक्त दगडे-पाटील यांच्या घरासमोर ढोल वाजवत महानगरपालिकेच्या सक्तीच्या कर वसुली विरोधात आंदोलन करतांना शिवसेनेचे नरेंद्र परदेशी, धीरज पाटील, प्रशांत भदाणे, दिलीप साळुंखे, भरत मोरे, ललित माळी, संदिप सूर्यवंशी, विनोद जगताप, जवाहर पाटील, ज्योती चौधरी , संदीप चौधरी, विकास शिंगाडे, मनोज जाधव, सिधु करणकाळ, कपिल लिंगायत, पिनु सूर्यवंशी, अजय चौधरी, प्रवीण राठोड, शिवाजीराव मराठे, दीपक जाधव, अनिल शिरसाट, अमोल ठाकूर, सचिन रुणवाल, शुभम रणधीर, पंकज भारस्कर, चंद्रकांत हजारे, सचिन पोतेकर, अनिल चौधरी, संजय पाटील, केतन भामरे, गुलाब धोबी, नंदु भामरे, तेजस सपकाळ आदी सह देवपूर मयूर कॉलनीतील ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी सहभागी झाले.

## धिवरेंना बालस्नेही पुरस्कार जाहिर

आहे. पुरस्कार सोहळ्याप्रसंगी राज्याचे उपमुख्यमंत्री ना.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना.अजित पवार, महिला व बालविकास विभागाच्या ना.अदिती तटकरे, राज्यमंत्री गृह शहरी योगेश कदम, महिला व बालविकास विभागाच्या राज्यमंत्री ना.मेघना बोर्डीकर आदि मान्यवर उपस्थित राहणार आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरेंना पुरस्कार जाहिर झाल्याने अनेकांनी शुभेच्छांचा वर्षाव केला आहे.

## शिवधाम उद्यानाचे नंदुरबारात लोकार्पण

रघुवंशी यांच्या हस्ते शिवधाम उद्यानाचे लोकार्पण करण्यात आले. यावेळी आकर्षक विद्युत रोषणाईने परिसर झळाळून निघाला. तसेच रंगीबेरंगी विद्युत दिव्यांच्या झगमगटाने भाविकांच्या डोळ्यांची पारणे फिटले. फटाक्यांच्या आतिषबाजीने महाशिवरात्रीसह शिवधाम उद्यानाचा लोकार्पण सोहळा साजरा करण्यात आला. याप्रसंगी खा.ॲड.गोवाल पाडवी, माजी नगराध्यक्षा रत्ना रघुवंशी, शिवसेना जिल्हाप्रमुख ॲड.राम रघुवंशी, उद्योजक मनोज रघुवंशी, माजी जि.प. अध्यक्ष वकीलं पाटील, शेतकी संघाचे चेअरमन बी.के. पाटील, माजी नगरसेवक किरण रघुवंशी, यशवर्धन रघुवंशी, सभापती कैलास पाटील यांच्यासह शिवभक्त उपस्थित होते. लोकार्पण सोहळ्यानंतर उद्यानात ध्यानावस्थेतील स्थानापन्न असलेल्या शिवजींच्या मूर्तीचे भाविकांनी दर्शन घेतले.

## विष प्राशन करून तरूणाची आत्महत्या

अत्यवस्थ वाटू लागले. उपचारासाठी सिव्हिल हॉस्पिटल येथे दाखल केले असता उपचार सुरू असतांना दि.२६ फेब्रुवारी रोजी दुपारी साडेचार वाजता डॉ.प्रफुल्ल पवार यांनी तपासून मयत घोषित केले. या प्रकरणी धुळे तालुका पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## नंदी रोड दवाखान्यात कर्मचारी द्या : स.पा.

**धुळे, दि.२७- मनपा तिरंगा चौक दवाखाना येथे कर्मचारी नियुक्ती करणेबाबत व काझी प्लॉट येथील गटार तसेच २ मार्च पासुन रमजान महिना चालु होत असल्याने संपुर्ण शहरात पाणी, लाईट, कचरा गाडी, व नाला साफसफाई करण्यात यावे. या मागणीचे निवेदन समाजवादी पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी मनपा उपायुक्त हेमंत निकम यांना दिले.**

मनपाचा तिरंगा चौक नंदीरोड दवाखान्यातील सूतिकागृह येथे रात्री सुरक्षारक्षक नसल्याने दवाखाना बंद असतो. सुतिकागृह असल्याने दवाखाना चोवीस तास सुरु असणे तसेच या ठिकाणी कर्मचारी नियुक्त करणे गरजेचे आहे. या ठिकाणी चोवीस तासांसाठी कर्मचारी नियुक्ती करण्यात यावा. तसेच ऐंशी फुटीरोड काझी प्लॉट येथील गटाराची नियमीतपणे साफसफाई होत नसल्याने वारंवार सांडपाणी रस्त्यावर येवून परिसरात दुर्गंधी पसरुन नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. या ठिकाणी असलेल्या नाल्यात साचलेल्या कचऱ्याची विल्हेवाट लावावी. प्रभाग क्र. १२ व १३ मधुन रोजंदारी कर्मचारी कमी करण्यात आलेले असुन या प्रभागात साफसफाई साठी कर्मचारी नेमणुक करण्यात यावी. अशी मागणी समाजवादी पार्टीचे माजी नगरसेवक अमिन पटेल, अबुलस खान, शकिल अवव्याज, आसिफ अन्सारी यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



## विहाराचा ताबा बौध्द भिख्खु संघाकडे देण्याची सं.संरक्षण समितीची मागणी

**धुळे, दि.२७- बिहार राज्यातील महाबोधी बुध्दविहार बुध्दगया येथे अवैधरितीने हिंदु ब्राम्हणांकडून पूजन करून कब्जा करण्यात आला आहे. ब्राम्हणांच्या ताब्यातुन परत मिळविण्यासाठी महाबोधी बुध्दविहार मुक्ती आंदोलन करण्यात येत आहे. या आंदोलनाला पाठिंबा देत संविधान संरक्षण समितीच्यावतीने राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांना जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांच्या माध्यमातून निवेदन देण्यात आले आहे.**

संविधानात कलम २५, २६, २७ नुसार देशातील विविध धर्मांना पुजा, उपासना, प्रचार व प्रसाराचा अधिकार दिलेला आहे. त्यानुसार हिंदु मंदिरात हिंदु पूजारी, मुस्लीम धर्मीयांच्या मशिदीत मौलाना, ख्रिश्चन धर्मियांमध्ये पुजारी ख्रिश्चन अशी परंपरा आहे संविधानाने दिलेला अधिकार आहे. बिहार राज्यातील महाबोधी बुध्दविहार बुध्दगया येथे ब्राम्हण पुजाऱ्यांनी कब्जा केलेला असून कलम २६ चे उल्लंघन आहे. बुध्दविहार ब्राम्हणांपासून मुक्तकरून बौध्द भिख्खु संघाकडे देण्यात यावे. अशी मागणी संविधान संरक्षण समितीचे संस्थापक अध्यक्ष हरिश्चंद्र लोंढे, सेवानिवृत्त प्राचार्य एम.बी.हातेकर, दिपकुमार साळवे, दैनिक आपला महाराष्ट्रचे संपादक हेमंत मदाने, श्रीकृष्ण बेडसे, प्रभाकर खंडारे, रामकृष्ण, रत्नशिल सोनवणे, सुभाष जाधव, काशिनाथ शिंदे, भगवान वाघ, प्रा.डॉ.विलास चव्हाण, प्रा.डॉ.मोहन मोरे, हर्षबोध मोरे, अनिल दामोदर, हर्षवर्धन आखाडे यांनी केली आहे.

## आगीवाल स्कूलमध्ये मराठी दिवस साजरा

धुळे, दि.२७- धुळे एज्युकेशन सोसायटीचे डॉ.गुलाबचंद रूपचंद आगीवाल इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये जागतिक मराठी दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी म्हणून शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.लता शहा, पर्यवेक्षक सौ.प्रणाली नाचरे, सौ. सिमरन शर्मा उपस्थित होत्या. सूत्रसंचालन सौ.मानसी माने यांनी केले तर हर्षल (पान २ वर)

**पाहिजेत**
दुकान कामासाठी माणूस, सेल्समन, हेल्पर, हमाल पाहिजेत.
सुपर इलेक्ट्रीक अ‍ॅन्ड लाईट हाऊस
३०८०, जमनालाल बजाज रोड, धुळे
9403427728
9226324664
9405170901

**पाहिजेत**
किडस् वेअर करिता अनुभवी सेल्समन त्वरित लावणे आहेत. आकर्षक पगार दिला जाईल.
Blushh KIDS WEAR
आग्रारोड, धुळे
9422786143

**भरती**
सरकारद्वारा रजिस्टर कंपनीत मुला-मुलींची डायरेक्ट भरती!
पात्रता : १० वी ते पदवीधर व १८ ते २८ वर्षे.
पगार ७००० च्या पुढे! राहणे+जेवण फ्री
(ग्रामीणांना प्राधान्य)
पत्ता : वाडीभोकर रोड, धुळे
फोन : 8469268899

**पाहिजेत**
मार्केटींग एक्झीक्युटीव्ह (मुलगा) पदवीधर
बॅक ऑफीस/रिसेप्शनिस्ट (मुलगी) पदवीधर /कॉम्प्युटर स्किल
सर्व्हिस इंजिनिअर (मुलगा) पदवीधर/फ्रेशर
पगार - ८००० ते १२००० पर्यंत
संपर्क : शॉप नं. ५१७, श्रीराम शॉपिंग कॉम्प्लेक्स, साक्री रोड, धुळे
मो. 9923196444, 9422770066

**कार्टून पुठ्ठा रु.१६.०० प्रति किलो बंडल**
येथे सर्व प्रकारची रद्दी विकत घेतली जाईल.
मेवावाला जिन कम्पाऊंड भारत वे ब्रिज, पारोळारोड, धुळे
फोन : 230540
9422296340

**पाहिजे**
रेडीमेड दुकानाचे कामासाठी सेल्समन/सेल्सगर्ल पाहिजे. प्रत्यक्ष भेटा!
महावीर ड्रेसेस
फुलवाला चौक, आग्रारोड, धुळे

**बंगला विकणे**
अग्रवाल नगर वल्लभ नगर, डोंगरे महाराज नगर
-: संपर्क :-
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**रोडटच शेती विकणे**
चाळीसगाव रोडटच आणि साक्रीरोड टच हॉटेल, मॅरेज लॉन, मंगल कार्यालयासाठी उपयुक्त एक एकर आणि दोन एकर शेती विकणे आहे
-: संपर्क :-
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**SVKM जवळ प्लॉटस् विकणे**
एस.व्ही.के.एम. शाळेजवळ सुसज्ज वसाहतीतील प्लॉट्स विकणे आहे
-: संपर्क :-
डि.आर.प्रॉपर्टीज
9422289693

**- पाहिजेत -**
● नर्स/स्टाफ
● RMO
डे-नाईट शिफ्टसाठी अनुभवी उमेदवार पाहिजेत
इच्छूक उमेदवारांनी समक्ष भेटावे
यशोदा हॉस्पिटल व नेत्रालय
दत्त मंदीर, देवपूर, धुळे
7058912916, 8329249386

**पाहिजेत**
होलसेल मेडीकलमध्ये कामासाठी मुले पाहिजेत
१) सेल्समन बाहेरगावी जाण्यासाठी. अनुभव असल्यास प्राधान्य.
तेजस डिस्ट्रीब्युटर्स
गल्ली नं.५, धुळे
8888096777

**विकणे आहे**
नवीन RTO कार्यालय रोडवरील आग्रारोड हायवे जवळील सर्व्हे नं.१०४ मधील जिवंत मोठी विहीरीसह 85x60=5100 चो.फू. हा प्लॉट योग्य किंमत आल्यास विकणे आहे.
-: संपर्क :-
7020261073

**भाड्याने देणे आहे**
गोल बिल्डींग जवळ, भारत गॅस समोर ग.नं.२ मध्ये (10x60) जागा तळ मजला भाडेतत्वावर देणे आहे.
-: संपर्क :-
9588485587

**पाहिजेत**
दुकानात कामासाठी वेटर/हेल्पर पाहिजेत.
पगार : १०,०००/- ते १२,०००/-
समक्ष भेटा!
अन्नपूर्णा
जलगाववाला मावा कुल्फी
म.गांधी चौक, धुळे

**पाहिजेत**
अनुभवी व्हेज, नॉनव्हेज कारागीर, तंदूर कारागीर, वेटर/हेल्पर पाहिजेत.
-: संपर्क:-
8007124449

**पाहिजेत**
मेडीकल होलसेल दुकानामध्ये कामासाठी मुले/मुली पाहिजेत.
१) कॉम्प्युटर ऑपरेटर
२) अकौन्टंट
३) सेल्समन बाहेरगावासाठी
३) मदतनिस/हेल्पर
संजय मेडीकल्स
गल्ली नं.२, धुळे
8483032975

**आकर्षक फॅन्स मॉडेलसह बचत ही ...**
atomberg "Why not?"



क्या आप जानते हैं
इंडक्शन मोटर के बजाय बीएलडीसी मोटर बेहतर क्यों हैं ?
इंडक्शन मोटर वह मोटर है, जिसका अब तक आप इस्तेमाल करते आए हैं. इसमे 75 वॉट बिजली की खपत होती हैं.
एटमबर्ग पंखे बीएलडीसी मोटर से चलते हैं. इनमें बिजली की खपत 35 वॉट होती हैं. इनसे हर साल ₹1500 तक की बचत होती है.
इसका मतलब यह है की हमारे पंखे 3* साल में फ्री हो जाते हैं.
ये इंवर्टर बैटरी पर 3x तक ज्यादा चलते हैं.
इनमें रेग्युलेटर की जरुरत नहीं होती है !
SAVES UP TO ₹1500 IN A YEAR
100% PURE COPPER MOTOR FOR A LONGER LIFE
57 वर्षापासून आपल्या सेवेत...
District Distributor श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही.
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करून आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-४००४११५, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०